जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२५/११/२०२३
## दि.२४/११/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो.स्टे.५७३/२०२३,भादविक ३०२ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६६ वर्षे, रा.वानवडी,पुणे |
| **आरोपीत** | रेणुका निखिल खन्ना, वय ३८ वर्षे,रा.फ्लॅट नं.८०२, बिल्डींग नं.ए/५,गंगा सॅटेलाईट सोसायटी, वानवडी, पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/११/२०२३ रोजी १२/३० वा.फ्लॅट नं.८०२,बिल्डींग नं.ए/५,गंगा सॅटेलाईट सोसायटी,वानवडी, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा नामे निखिल पुष्पराज खन्ना,वय ३६ रा.सदर यांनी त्याची पत्नी नमुद महिला हिस तिच्या वाढदिवशी दुबई येथे घेवुन गेला नाही.तसेच तिचे ॲनिव्हरसरीला त्याने मनासारखे गिफ्ट दिले नाही आणि तिला तिचे भावाचे मुलीचे वाढदिवसाला दिल्ली येथे जाणेबाबत विमान तिकीटाचे अरेंजमेंट करत नसल्याने त्याचा राग मनात धरुन नमुद महिला हिने फिर्यादी व त्यांची पत्नी हे बाहेर गेले असताना पती नामे निखिल यांचे तोंडावर व नाकावर कशाने तरी मारुन गंभीररित्या जखमी करुन जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.दत्तप्रसाद शेंडगे मो.नं.९०११२५३०००३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २८३/२०२२,भादविक ४५७,३८०,५११,४२७ |
| **फिर्यादी** | विजय कुमार विट्रीवेल, वय ३० वर्षे, रा.वानवडी,पुणे |
| **आरोपीत** | तपनदास बसंतादास वय २९ वर्षे रा.पस पताचारकुची,पोस्ट भेबला,जि.बक्सा,राज्य आसाम (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/११/२०२३ रोजी ००/३० ते दि.२४/११/२०२३ रोजी ०१/३० वा.चे सुमा.तामिळनाडु मर्कंटाईल बँक,सोलापुर बाजार रोड,कॅम्प पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे तामिळनाडु मर्कंटाईल बँक,सोलापुर बाजार रोड,येथे असिस्टंट बँक मॅनेजर,म्हणुन काम करीत असुन नमुद इसम याने बॅकेचे दरवाजाचे शटरचे लॅच लॉक व लोखंडी कुलूप तोडून त्याव्दारे आत प्रवेश करून बँकेतील चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.एम.डी.कांबळे मो.नं.७२४९००८००८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे.११८८/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | सदाशिव वाघमारे वय ५७ वर्षे रा.खोपडे नगर,कात्रज पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/११/२०२३ रोजी ११/१५ वा गोकुळनगर गल्ली नंबर ३ कोंढवा पुणे येथील शिवदत्त डेअरी फार्म मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची शिवदत्त दुध डेअरी ही कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने डेअरीचे शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन गल्यातील रोख ४,०,५०००/- रुपये कोणीतरी अज्ञात चोरटयाने लबाडीच्या इरादयाने चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी दिनेश पाटील मो.नं.९५९४६९११७७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे.८६५/२०२३,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५४ वर्षे रा.बाणेर पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/११/२०२३ रोजी सकाळी ०६/०० वा ते ०६/१५ वा.चे दरम्यान ज्युपीटर हॉस्पिटलचे समोर रोडवर,बाणेर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पायी जात असताना वरील नमुद इसमांनी दुचाकी वरून येऊन फिर्यादी यांना पुढे मारामारी चालू आहे असे सांगून त्याचे गळयातील ७५,०००/-रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण काढून रुमालात ठेवण्यास सांगितले फिर्यादी यांनी त्याचेवर विश्वास ठेवुन नमूद इसम यांनी सदर दागिने त्याचेकडे ठेवण्यास सांगितले असता फिर्यादी यांनी सदर दागिने त्यांना दिले असता नमूद इसम यांनी ते दागिने घेवून मोटर सायकलवरून निघून गेले. |
| **त.अंमलदार** | सहा पो.निरी.पाटील मो.नं.९०११७१९१०० |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो.स्टे.७६३/२०२३,भादविक २७९,३०४(अ) ४२७ |
| **फिर्यादी** | प्रकाश नेताजी शिंदे पो.अमंलदार नेमणुक भारती विद्यापीठ पोलीस ठाणे पुणे |
| **आरोपीत** | रुपेश लुईस वाघमारे वय ४२ वर्षे रा.स.नं.१०३ नेहरुनगर वसंतदादा पाटील शाळेजवळ पिंपरी पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/११/२०२३ रोजी सकाळी ६/३० वा.जांभुळवाडी पुलाच्या पुढे इंडियन पेट्रोल पंपाच्या थोड अलीकडे रोडवर आंबेगाव पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील पॅगो टॅम्पो हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन पॅगो टॅम्पो रस्त्याचे कडेला असलेले सिमेंटचे पोलला धडकवून टॅम्पो पलटी करून त्या खाली सापडून स्वतः गंभीर जखमी होऊन स्वतःचे मरणास कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पोउपनि देशमुख ९७६५३९०९४३ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे.५७५/२०२३,भादविक ३५३,३५२,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय २२ वर्ष रा.कर्वे नगर,पुणे |
| **आरोपीत** | एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/११/२०२३ रोजी १८/३० वा.सिहंगड रोड क्षेत्रिय कार्यालय,वडगाव पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सिंहगड रोड अतिक्रमण विभाग येथे सहायक अतिक्रमण निरिक्षक या पदावर नेमणुकीस असून ते सिहगड रोड येथे अतिक्रमण कारवाई करित असताना नमुद महिला यांनी तिच्यासोबत आणलेल्या प्लास्टीकच्या बाटलीमधील द्रावक पदार्थ फिर्यादी यांचे अंगावर ओतण्यासाठी धावुन आली.तसेच फिर्यादी यांना शिवीगाळ करुन फिर्यादी यांचे सोबत असलेली महिला सुरक्षा रक्षकासोबत झटापटी करुन फिर्यादी हे करत असलेल्या सरकारी कामात अडथळ अणला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पोलीस लोहार मो.नं.९४२२७७१०९९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**